मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
प्र.प./न.प. [illegible]
आवक क्र. २१/२०२१-२२
दिनांक:- २८/४/२०२१

# जोडपत्र (अ)

माहितीचा अधिकार अधिनियम २००५

आवक क्र. ०४
२२/४/२०२१

प्रति,

मा. जनमाहिती अधिकारी,
आयुक्त कार्यालय,
मिराभाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), जि.:- ठाणे.

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव : राजीव त्रिंबक देशपांडे

२. पत्ता : बी ५५, नूतन निवास, [illegible] नगर, वसई रोड (पश्चिम), वसई ४०१२०२

३. माहितीचा विषय : – दि. २ मार्च २०२१ रोजीच्या शासन निर्णय क्र.:- मिशाम-१९२०/प्र.क्र. ४६/नवि-२८ च्या अमंलबजावणीबाबत

४. माहितीशी संबंधित कालावधी – अर्ज निर्णय होईपर्यंत.

५. माहितीचे वर्णन : –
अ] वरील विषयांकीत विषयाबाबत आपल्या विभागामार्फत शासनाकडे पाठविण्यात आलेल्या व शासनाकडून प्राप्त सर्व पत्रव्यवहार, दस्तऐवजांच्या साक्षांकीत प्रती पुरविणे.
ब] वरील विषयांकीत प्रकरणी महापालिका स्थायी समिती सभा, महासभा मंजूर ठरावांच्या साक्षांकीत प्रती पुरविणे.
क] वरील विषयांकीत शासन निर्णय प्राप्त झाल्याबाबत व संबंधित पालिका विभाग प्रमुखांना अमंलबजावणीसाठी पारित केलेल्या परिपत्रकांच्या आवक-जावक रजिस्टर नोंदीसह सर्व मुद्यांच्या परिपत्रकांच्या साक्षांकीत प्रती पुरविणे.
ड] वरील विषयांकीत शासन निर्णयानुसार सुरक्षा रक्षक ठेक्याबाबत पारित कारवाईची साक्षांकीत माहिती व जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून जबाबदार अधिकाऱ्यांची नावे, पदनाम, कार्यरत विभाग याबाबत साक्षांकीत माहिती पुरविणे.

६. माहिती टपालाद्वारे हवी की व्यक्तिश : – व्यक्तिश:

अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक : – २२ एप्रिल २०२१.

(राजीव त्रिंबक देशपांडे)

०१८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/माहिती अधिकार./ २९ /2021 — दिनांक :- २८/०४/2021

प्रति,
श्री. राजीव त्रिंबक देशपांडे,
बी/15, नुतन निवास, वीर सावरकर नगर,
वसई रोड (पश्चिम), वसई 401202
जि. पालघर

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
दि. 2 मार्च 2021 रोजीचा शासन निर्णय क्र. मिभाम-1120/प्र.क्र.46/नवि-28 च्या अंमल बजावणीबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 22 एप्रिल 2021 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.
(या कार्यालयास सामान्य विभागामार्फत ईमेलद्वारे प्राप्त दि. 26/04/2021)

महोदय,

उपरोक्त संदर्भित पत्रातील मुद्दा क्र. "ब" नगरसचिव विभागाशी निगडीत असल्याने, सामान्य प्रशासन विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेमार्फत संदर्भित पत्राची प्रत ईमेलद्वारे या कार्यालयाकडे दि. 26/04/2021 रोजी वर्ग करण्यात आलेली आहे. आपणांकडील संदर्भित पत्रातील मुद्दा क्र. "ब" नुसार मा. महासभा दि. 07/06/2019 ठराव क्र. 25 व मा. स्थायी समिती सभा दि. 17/08/2020, ठराव क्र. 27 ची साक्षांकित प्रत या पत्रासोबत आपणांस उपलब्ध करुन देत आहोत. संदर्भित पत्रातील मुद्दा क्र. अ, क व ड या विभागाशी निगडीत नाहीत.

वरीलप्रमाणे आपणांस ठरावांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात येत असुन, सदर माहितीबाबत आपणास आणखी विचारणा करावयाची असल्यास माझ्याशी प्रत्यक्ष अथवा भ्रमणध्वनी क्र. 9967481732 वर संपर्क साधावा.

तरीही आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9967481732)

सर्व हक्क राखून
3-5-2021

pc 2Z:\Pranali\Mahiti Adhikar\Letter - Rajiv Deshpande.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 07/06/2019

**प्रकरण क्र. 24** :- **शहरातील उद्याने बगीचा, मैदाने, दुभाजक हे देखभाल, दुरुस्ती, सुरक्षा, झाडे लावणे, जगविणे, खेळणी दुरुस्ती करणे, रंगरंगोटी करणे इत्यादी कामाचे धोरण ठरविणे.**

**ठराव क्र.** २५

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये 74 उदयाने, 11 मैदाने, 14 स्मशाने, 2 चौपाटया, 1 नर्सरी, 17 किमी लांबीचे दुभाजक आहेत. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत खालील कामे करण्यात येतात.

1) सुरक्षा रक्षक पुरवठा
2) मजुर पुरवठा
3) लालमाती, शेणखत, औषधे
4) देखभाल व निगा
5) नविन रोपे लावणे, गवत लावणे
6) रंगरंगोटी, दुरुस्ती
7) खेळणी दुरुस्ती
8) शौचालय, पाणपोई साफसफाई व दुरुस्ती
9) विद्युत दुरुस्ती इ.

वरील व इतर आवश्यक कामांवर महानगरपालिकेचा मोठ्या प्रमाणावर खर्च होत असून देखील कामात गुणवत्ता व समाधानकारक कामे होत नाहीत. सर्व कामांसाठी वेगवेगळ्या निविदा मागवून वेगळे कंत्राटदार नेमण्यात येत असल्याने सर्व कामांची सांगड घालता येत नाही व कामांना देखील विलंब होत असतो. महानगरपालिकेची उद्याने, मैदाने, दुभाजक, चौपाट्या इ. ची देखभाल व दुरुस्ती तसेच वरील प्रमाणे नमुद सर्व साहित्य, सामुग्री व मजुर, सुरक्षा रक्षक पुरवठा करुन काम करण्यासाठी बागकाम मध्ये तज्ञ व अनुभव असलेल्या एजन्सीला कामे दिल्यास त्यांच्यामार्फत सर्व कामे व्यवस्थितरित्या होवू शकतील. सर्व एजन्सीला सदर ठिकाणी मा. आयुक्त यांच्या मान्यतेने कॅन्टीन सुरु करणेस व जाहिरात कामाची देखील मुभा ठेवण्यात यावी. तसेच नव्याने उद्याने, मैदाने, दुभाजक विकसीत झाल्यास मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मंजुर असलेल्या दराने सदर काम देखील देण्यात यावे. वरील प्रमाणे एकच निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत असून सर्व प्रशासकीय कार्यवाहीचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रिया पुढील दोन महिन्यात पूर्ण करन कंत्राटदाराची नेमणूक करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-** श्री. हसमुख गेहलोत | **अनुमोदक :-** श्रीम. सिमा शाह

**ठराव बहुमताने मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली सत्यप्रत
जनसंपर्क अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.17/08/2020

## उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग

**प्रकरण 30 :- मिरा भाईदर महापालिका क्षेत्रातील उद्याने,मैदाने,स्मशाने व दुभाजके यांची निगा व देखभाल इत्यादी कामे 2 वर्षे कालावधीकरिता करणेकामी E-Tendering Online पध्दतीने मागविलेल्या निविदेबाबत.**

**ठराव क्र.** 26 :-

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रामधील उद्याने, मैदाने, स्मशाने, दुभाजके व इत्यादी ठिकाणांच्या निगा व देखभालीकरिता मोठ्या प्रमाणात खर्च होत असून देखील कामात गुणवत्ता व कामे समाधानकारक होत नव्हती. त्यामुळे निगा व देखभाल दुरुस्तीवर होणारा खर्च कमी करण्याकरीता निगा व देखभालीची एकत्रित निविदा मागविण्याचे धोरणात्मक निर्णय मा.महासभा दि.07/06/2019, ठराव क्र. 25 अन्वये करण्यात आला होता.

महासभेच्या ठरावाप्रमाणे उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाने निविदेचे अंदाजपत्रक तयार केले नाही. या निविदेत सुरक्षारक्षक, रंगरंगोटी, दुरुस्ती, खेळणी दुरुस्ती, शौचालये व पाणपोई साफसफाई व दुरुस्ती, विद्युत दुरुस्तीचा खर्च समाविष्ट नसल्याने पुन्हा महापालिकेला हा खर्च सोसावा लागेल.

मा.महासभा दि.07/06/2019, ठराव क्र.25 अन्वये उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाने निविदा मागविली नसल्याने मे.निसर्ग लेण्डस्केप सर्व्हिसेस यांची मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने, दुभाजके व इत्यादी ठिकाणांच्या निगा व देखभालीकरिता वार्षिक दराची निविदा फेटाळण्यात येत आहे व महासभेच्या ठरावाप्रमाणे उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाने निविदेचे अंदाजपत्रक तयार करुन पुन्हा निविदा मागविणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :-** Dinesh
श्री.दिनेश जैन

**अनुमोदक :-** Rakesh
(Rakesh Shah)
श्री.राकेश शाह

अशोक तिवारी
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जन माहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\jyotsna hasnale\17-08-2020\All Tharav.docx